# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,हिंगोली

**(गृह विभाग, कायदा व सुव्यवस्था)**

E-mail ID :- rdc.hingoli123@gmail.com दुरध्वनी-02456 221450

जिल्हा दंडाधिकारी हिंगोली

वाचा- 1-या कार्यालयाचे आदेश जा.क्र. 2020/डिसी-1/Crpc-144 कावी दि.31/03/2020 व 13/04/2020

2-या कार्यालयाचे आदेश जा.क्र.2020/डिसी-1/ कोवीड-19/कावी- दिनांक 06/04/2020 व दि.09/04/2020

3- महाराष्ट्र शासनाची अधिसुचना No.DMU/2020/CR.92/DisM-1दि.13/04/2020.

4- या कार्यालयाचे आदेश जा.क्र. 2020/डि सी-१/कोव्हीड-19/कावी दि.15/04/2020

5- महाराष्ट्र शासन अधिसुचना दि.17/04/2020.

6- या कार्यालयाचे आदेश जा.क्र. 2020/डि सी-1/कोव्हीड-19/कावी दि.19/04/2020

---

जा.क्र.2020/डिसी-1/ कोवीड-19/कृषी सेवा केंद्र व इतर /आदेश क्र-101 दिनांक. 21.04.2020

**सुधारीत** आदेश :-

ज्याअर्थी, जागतीक आरोग्य संघटनेने कोरोना (कोव्हीड-19) हा विषाणू मूळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषत केला आहे. कोरानाग्रसत रुग्णांचे संपर्कात लोकांनी येवू नये म्हणुन सार्वजनिक किंवा खाजगी जागेत पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीनी एकत्र येणे, थांबणे, चर्चा करणे, काही कार्यक्रमाचे आयोजन केल्यास या विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता सर्वसामान्य जनतेस व त्यांचे आरोग्यास धोकादायक निर्माण होऊ शकतो या मुळे फौजदारी प्रकीया संहिता 1973 चे कलम 144(१)(3) अन्वये संपुर्ण जिल्हयामध्ये संचारबंदी लागु झाल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

खरीप हंगाम हा जवळ येत आहे व व्यापा-यांना खते व बियाणेचा साठा करणे साठी तसेच शेतीसाठी उपयोगी महत्वाचे साहित्य जसे की ड्रीप, स्प्रिंकलर व पाईप पुरवठा सुरळीत असणे आवश्यक असल्याने ही सर्व दुकाने व जिल्हयातील परवानाधारक कृषी सेवा केंद्र, उघडणे आवश्यक असल्याने या कार्यालयाचे संदर्भीय आदेश क्र. 4 अन्वये ठरवुन दिलेल्या वेळापत्रकानुसार सकाळी 9.00 ते दुपारी 1.00 वाजेपर्यंत सुरु ठेवणे करीता आदेश निर्गमीत करण्यात आले होते परंतु संदर्भ क्र.5 नुसार शेतीसाठी उपयोगी महत्वाचे साहित्य जसे की ड्रीप, स्प्रिंकलर व पाईप पुरवठा सुरळीत असणे आवश्यक असल्याने ही सर्व दुकाने व जिल्हयातील परवानाधारक कृषी सेवा केंद्र, कृषी विषयक कामे व तसेच कृषी व बागायती कामासाठी लागणारे साहित्य विक्रि व उत्पादन करणे ,कृषी माल खरेदी विक्री केंद्रे यांना यामधुन सुट दिली आहे.त्या नुसार संदर्भीय आदेश क्र. 6 अन्वये उपरोक्त नमुद सर्व दुकाने व जिल्हयातील परवाना धारक कृषी सेवा केंद्र दि.20/04/2020 पासुन प्रतिदिन सकाळी 09.00 ते दुपारी 1.00 यावेळेत संदर्भीय आदेशात नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या आधारे सुरु ठेवण्यास परवानगी देण्यात आली होती.सदर **संदर्भीय क्र.4 व 6 चे आदेश रद्द करुन या अन्वये सुधारीत आदेश निर्गमीत करण्याचे माझे मत झाले आहे.**

**त्या अर्थी मी रुचेश जयवंशी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हिंगोली खालील प्रमाणे ठरवुन देण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार एक दिवस आड जिल्हयातील व्यापा-यांना खते व बि-बियाणेचा साठी करण्यासाठी तसेच शेतीसाठी उपयोगी महत्वाचे साहित्य जसे की ड्रीप, स्प्रिंकलर, पाईप पुरवठा, कृषी यंत्रे, अवजारे, ट्रॅक्टर व त्यांचे सुटे भाग ई दुकाने व त्यांच्या दुरुस्तीची दुकाने सुरळीत असणे आवश्यक असल्याने तसेच कृषी विषयक कामे व कृषी, बागायती कामासाठी लागणारे साहित्य विक्री व उत्पादन करणे, कृषी माल खरेदी विक्री केंद्र ही सर्व दुकाने व जिल्हयातील परवाना धारक कृषी सेवा केंद्र खालील वेळापत्रकानुसार तसेच अटी व शर्तीच्या अधिन राहुन सुरु ठेवण्याची या आदेशान्वये परवानगी देण्यात येत आहे.**

: वेळापत्रक :

| अ.क्र. | दिनांक | वार | वेळ |
|---|---|---|---|
| 1. | दिनांक 22/04/2020 | बुधवार | सकाळी 09.00 ते दु. 01.00 वाजता पर्यंत |
| 2 | दिनांक 24/04/2020 | शुक्रवार | |
| 3 | दिनांक 26/04/2020 | रविवार | |
| 4 | दिनांक 28/04/2020 | मंगळवार | |
| 5 | दिनांक 30/04/2020 | गुरुवार | |
| 6 | दिनांक 02/05/2020 | शनिवार | |



Scanned with CamScanner

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,हिंगोली

**(गृह विभाग, कायदा व सुव्यवस्था)**

E-mail ID :- rdc.hingoli123@gmail.com दुरध्वनी-02456 221450

**सदरील उदयोग सुरु करते वेळेस खालील अटी व शर्तींचे पालन करणे बंधनकारक राहील.**

1. संबंधितानी दिनांक .22/04/2020 पासुन उदयोगाची सुरुवात करताना संर्पुण जागेचे सेनिटायझेशन करुनच सुरवात करुनच सुरुवात करावी.
2. दुकानातील कामावर आलेले कामगार व खरेदीदार यांची नोंद ठेवणे गरजेचे आहे जसे की, नाव, संर्पकाचा पत्ता व मोबाईल क्रमांक.
3. दुकानदाराने व त्यांच्या सोबत काम करणा-या कामगारांनी नेहमीच नाक आणि तोंड माक्सने पुर्णपणे झाकुन ठेवणे बंधनकारक आहे.
4. खरेदी करण्यासाठी आलेल्या दोन ग्राहाकामध्ये एक मिटरचे अंतर राहील यांची दक्षता संबधीत विक्रेत्यांनी घ्यावी. तसेच Sanitizer उपलब्ध ठेवण्यात यावेत.
5. खरेदी करण्यासाठी आलेल्या ग्राहकांना उभे राहण्यासाठी दुकानासमोर 1 मिटरचे अंतराने गोल/चौकोन आखणी करणे आवश्यक राहील.
6. दररोज कामावर येणा-या कामगारांची तपासणी थर्मल गन च्या सहाय्याने करण्यात यावी.
7. दुकानदारांनी कामगारासाठी मास्क व Sanitizer उपलब्ध करुन देण्यात यावेत.
8. दुकानाच्या परिसरामध्ये कामगारासाठी पिण्याच्या पाण्याची व हात धुण्याच्या पाण्याची व्यवस्था योग्य ठिकाणी करण्यात यावी व पाणी उपलब्ध राहील यांची दक्षता घेण्यात यावी.
9. शासनाने ठरवुन दिलेल्या अंतराच्या परीसीमाचे तंतोतंत पालन करुन उदयोग धंदयाच्या ठिकाणी व परीसरामध्ये सामाजीक अंतराचे ( social Distance ) पालन करण्यात यावे व जागोजागी सुरक्षततेच्या उपाययोजनांचे माहिती फलक लावण्यात यावेत.

या आदेशामध्ये नमुद कालावधी वगळता इतर कालावधीमध्ये वर नमुद कामासाठी कोणासही घराच्या बाहेर पडता येणार नाही. तसेच या आदेशाचे पालन न करणा-या कोणत्याही व्यक्ती, संस्था अथवा समुह आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 तसेच भारतीय दंड संहिता 1860 चे कलम 188 नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे समजण्यात येईल आणि पुढील कार्यवाही करण्यात येईल यांची दक्षता घ्यावी.

संबंधित आस्थापना मालक/चालक/व्यवस्थापक यांना प्रत्येकास आदेशापूर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने याबाबतची माहिती प्रसार माध्यमे, उप विभागीय दंडाधिकारी, तालूका कार्यकारी दंडाधिकारी, पोलीस स्टेशन, सर्व जि.हिंगोली यांचे नोटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

हे आदेश दिनांक. 21/04/2020 रोजी माझे सही व शिक्यानिशी निर्गमीत करण्यात येत आहे.

स्वा/-
**(रुचेश जयवंशी)**
**जिल्हादंडाधिकारी हिंगोली.**

**प्रतीलीपी,**

1.मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद. यांना माहितीस्तव.
2.पोलीस अधिक्षक हिंगोली यांना आवश्यकत्या कार्यवाहीस्तव
3.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. हिंगोली यांना आवश्यकत्या कार्यवाहीस्तव
4.उपविभागीय दंडाधिकारी हिंगोली/कळमनुरी/वसमत यांना आवश्यकत्या कार्यवाहीस्तव
5.उपायुक्त पशुसर्वधन , हिंगोली. यांना आवश्यकत्या कार्यवाहीस्तव
6.जिल्हा कामगार अधिकारी हिंगोली यांना आवश्यकत्या कार्यवाहीस्तव.
7.जिल्हा निबंधक सहकारी संस्था हिंगोली यांना आवश्यकत्या कार्यवाहीस्तव.
8.जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, हिंगोली यांना आवश्यकत्या कार्यवाहीस्तव.
9.तालुका दंडाधिकारी हिंगोली/कळमनुरी/सेनगाव/वसमत/औंढा ना. यांना आवश्यकत्या कार्यवाहीस्तव
10.मुख्याधिकारी नगरपालीका/नगर पंचायत हिंगोली/वसमत/कळमनुरी/सेनगांव/औंढा यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
11.जिल्हा माहीती अधिकारी हिंगोली यांना प्रसिध्दीस्तव. यांना आवश्यकत्या कार्यवाहीस्तव

**(रुचेश जयवंशी)**
**जिल्हादंडाधिकारी हिंगोली.**

Scanned with CamScanner